# बौद्ध धर्माचा आर्थिक इतिहास एक ऐतिहासिक अभ्यास

**प्रा. डॉ. आशिष गजानन थूल**

इतिहास विभाग प्रमुख

एस. चंद्रा महिला महाविद्यालय आमगाव जी. गोंदिया

मो. न. ७९७२९५१३१८

इ मेल : ash.thool@gmail.com

---

***सारांश :***

*या शोध निबंधामध्ये बौद्ध धर्माचा  आर्थिक इतिहास यावर सविस्तर चर्चा केली.यामध्ये प्राचीन बौद्ध धर्माची का आणि कशी निर्मिती झाली यावर प्रकाश टाकला.प्रसिद्ध असलेला त्या काळातील वैदिक धर्म असूनही लोकांनी मध्यम मार्ग असलेल्या बौद्ध धर्माचा स्वीकार का केला यावर चर्चा केली.तो भारतात कसा मोठा झाला याचेही वर्णन केले.बौद्ध भिक्षूंची जीवनपद्धती,दानधर्म,संघ व्यापार,व्यापारी ठिकाणे,स्थल व जल व्यापार, बौद्ध धर्माला राजांनी दिलेला राजाश्रय, व्यापाराची पद्धती,चलन व्यवस्था,सुरवातीच्या काळातील व्यापार व्यवस्था आणि नंतरच्या काळातील आर्थिक व्यवस्था या सर्व घटकांवर विस्तृत माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे.नंतरच्या काळात मुस्लीम आक्रमणामुळे बौद्ध मठांची मोठ्या प्रमाणात हानी झाली.वैदिक धर्माचे पुनरुथान झाल्यामुळे बौद्ध धर्माचा आर्थिक पाठिंबा पण कमी झाला.मठांच्या संपत्तीची लुट झाली. ज्यामुळे बौद्ध धर्माची हानी सुरु झाली. बुद्धाच्या मृत्यूनंतर संघाच्या नियमात आणि आचरणात हि फरक जाणवू लागला.लोकांनी नंतरच्या काळात मोठ्या प्रमाणात मुस्लीम धर्माचा स्वीकार केला.बौद्ध विश्वविद्यालयाचे मुस्लीम आक्रमणामुळे झालेले नुकसान या सर्व कारणामुळे बौद्ध धर्माची हानी सुरु झाली.पण १९५६ ला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करून या धर्माला नवचेतना निर्माण करून दिली.लाखो अनुयायांनी या धर्माचा स्वीकार केला आणि आज जगाच्या पाठीवर अतिशय प्रगत धर्म म्हणून हा धर्म नावलोकिक झाला आहे.*

---

**प्रस्तावना :**

भारतात उदयाला आणि जगभर पसरलेला  बौध्द धर्म हा एक प्राचीन धर्म आहे. इसवी सन पूर्व सहाव्या शतकात गौतम बुद्धांनी  त्याची स्थापना केली.आशिया खंडात सर्वाधिक अनुयायी असलेला धर्म म्हणून तो ओळखला जातो. भारताप्रमाणे श्रीलंका, चीन, ब्रह्मदेश, तिबेट, कोरिया, जपान, थायलंड, इंडोनेशिया, जावा आणि व्हिएतनाम इत्यादी आशियाई देशांमध्ये त्याचा प्रभाव आहे. काही देशांमध्ये त्याला राष्ट्रीय धर्माची मान्यता मिळाली आहे. ईश्वराचे अस्तित्व नाकारणारा आणि नैतिकता व बुद्धी प्रमाण्यला  याला महत्त्व देणारा हा धर्म आहे.

प्राचीन भारताच्या समाज जीवनात जैन धर्माचा व्यापक प्रमाणात झालेला प्रसार आणि बौद्ध धर्माचा उदय या दोन महत्त्वपूर्ण घटना आहेत त्यामुळे भारतीय संस्कृतीला विविधता प्राप्त झाली आहे. एकीकडे वैदिक धर्माचे



Research Hub International Journal

परिवर्तन हिंदू धर्मात होत आहे आणि दुसरीकडे हिंदू धर्माच्या चौकटीच्या आत बाहेर राहण्याचा प्रयत्न जैन आणि बौद्ध धर्माची नवी जुनी धार्मिक चौकट सिद्ध होत होती. यज्ञयाग, कर्मकांड,चातुर्वर्ण व्यवस्था यांच्या जोकडातून मुक्त होण्याची प्रक्रिया या दोन्ही धर्मांनी गतिमान केली. बौद्ध धर्माचे संस्थापक गौतम बुद्ध यांचे जीवन कार्य भारतीय संस्कृतीला समृद्ध आणि विविधतापूर्ण करणारे ठरले. त्या काळातील परिस्थितीचा विचार करता शूद्र आणि महिलांवर होत असलेले अन्याय अत्याचार या विरोधात जाऊन बुद्धाने नवीन धर्माची स्थापना केली. या धर्मातील साधेपणा, मध्यममार्ग, सर्वांना खुला असलेला प्रवेश राजांचा मिळालेला राज आश्रय,स्त्री पुरुष समानता, स्वातंत्र्य यासारखे अतिशय साधे आचरण या धर्माचे वैशिष्ट्य असल्यामुळे मोठ्या प्रमाणात लोकांनी या धर्माचा स्वीकार करणे प्राचीन काळात सुरू केले. प्राचीन काळात इतर धर्माच्या तुलनेत ज्या परंपरा होत्या.त्या अतिशय साध्या व विज्ञानावर आधारित होत्या. बौद्ध धर्माचा समाजाच्या आर्थिक रचनेवर अनेक महत्त्वपूर्ण परिणाम झालेत त्याचा अभ्यास आपण या संशोधनपर पेपरमध्ये करणार आहोत.

**प्रारंभीचा बौद्ध काळ व अर्थकारण :**

तथागत गौतम बुद्धाने धर्माच्या प्रसारासाठी संघाची स्थापना केली. वेगवेगळे ठिकाणी संघ होते. त्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात बौद्ध धर्माचा प्रसार संपूर्ण भारत व आशिया खंडात झालेला आपल्याला दिसून येते. नंतरच्या काळात तो युरोपातही गेला. बुद्धाच्या काळात संघाचे नियम अतिशय कठोर असलेले आपल्याला दिसून येते. सभागृहात जेव्हा हे सर्व भिक्षु संघ एकत्र येत होते प्रत्येकाचे वेगळे आसन होते. त्या आसनाची व्यवस्था करण्यासाठी एका कर्मचाऱ्याची निवड करण्यात आली होती. संघामध्ये ज्या विषयावर चर्चा होणार होती. त्या विषयाला पहिले प्रस्तावाच्या स्वरूपात मांडावे लागत असे. त्याच्यावरती नंतर चर्चा होत असे. आणि निर्णय घेण्यासाठी मतदान केले जात असे. संघाच्या बैठकीसाठी कमीत कमी 20 भिक्षूंची उपस्थिती आवश्यक होती ते नसल्यास त्यामध्ये घेतलेल्या निर्णयांना मान्यता मिळत नव्हते. बहुमताला मान्यता होती. **(विद्यालंकार सत्यकेतु, प्राचीन भारत का धार्मिक,सामाजिक एवं आर्थिक इतिहास,प्रकाशक श्री सरस्वती सदन ,नवी दिल्ली)** संघातील प्रत्येक भिक्षूंना कठोर नियमांचे पालन करावे लागत असे. भिक्षूंना कुठलीही स्वतःची संपत्ती ठेवण्यास मनाई होती. त्यांचे संपूर्ण जीवन हे दानावर आधारित होते. मठांना अन्न, वस्त्र ,निवासाची सोय हे दानाच्या माध्यमातून केली जात होती. त्याकाळात दान हे उत्तम काम असून ते कर्म सिद्धांताशी जोडले असल्यामुळे मोठ्या प्रमाणात दान दिल्या जात होते.असे लक्षात येते.

**शब्द संकेत :** बौद्ध धर्म,विद्यापीठ,व्यापार,राजाश्रय,दानधर्म,संघ, अनुदान

**उद्देश** :

1) प्राचीन काळातील बौद्ध धर्माची माहिती जाणून घेणे.
2) प्राचीन काळातील बौद्ध काळातील व्यापाराचा आढावा घेणे.
3) बौद्ध धर्म आणि राजाश्रय याची माहिती घेणे.

**गृहीतके :**

1) विविध राजांनी बौद्ध धर्माला राजाश्रय दिला.

2) बौद्ध काळात व्यापाराची अनेक ठिकाणे असून व्यापार उन्नत होता.
3) बौद्ध काळात शैक्षणिक संस्थांचा मोठ्या प्रमाणात विकास झाला होता.

**बौद्ध धर्म आणि राजाश्रय :**

सम्राट अशोक इस.पू.२६८ ते इस.पू.२३२ मोर्य काळातील सर्वश्रेष्ठ सम्राट होता.त्याने आशिया खंडातील बहुतेक भागावर राज्य केले होते. सम्राट अशोकाचे तथागत बुद्ध यांच्यावर मोठ्या प्रमाणात निष्ठा होती. त्यामुळे त्यांनी स्वतः बरोबर संपूर्ण परिवारासहित बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. त्याचा परिणाम असा झाला की, त्यांच्या राज्यातील सर्व लोकांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. बौद्ध धर्माला राष्ट्रधर्म म्हणून त्यांनी घोषित केला.

त्यांनी बौद्ध धर्माचा प्रसार संपूर्ण भारतात व देशाबाहेरही केला. त्यांनी बौद्ध धर्माला मोठ्या प्रमाणात दान दिले. धर्माशी संबंधित मोठ्या मोठ्या वास्तूकला उभारल्या. 84 हजार स्तूपाची निर्मिती केली असे म्हणतात.भिक्षूनादान, भोजन, वस्त्र औषधी यासारख्या वस्तूचे दान मोठ्या प्रमाणात करत होते. सम्राट अशोकाने स्तूप,विहार, धर्मचक्र इत्यादी उभारले. विविध सार्वजनिक कामासाठी निधी उपलब्ध करून दिला. सम्राट अशोकाने 14 शिलालेखाची निर्मिती केली त्यामध्ये विविध शिलालेख बौद्ध धर्माविषयी लिहून ठेवले आहे. त्यांनी विविध धम्मसभाचे आयोजन केले. असे म्हणतात पाटलीपुत्र येथे त्याने अशोकाराम नावाचे बुद्ध विहाराची स्थापना केली व तिथे दर दिवशी 60000 भिक्षूंना भोजन दिल्या जात होते.**(खोब्रागडे एल. एन.,बौद्ध कालीन भारत का इतिहास, समता प्रकाशन नागपूर)**

गुप्त काळात हिंदू धर्माला अधिक महत्व असले तरीही बौद्ध धर्माचा प्रसार आणि विकास थांबलेला दिसून येत नाही. गुप्त सम्राट कुमार गुप्त महेंद्रदित्य याने विश्वविख्यात नालंदा विश्वविद्यालयाची स्थापना केली. नालंदा विश्वविद्यालयामुळे नंतरच्या काळात मोठ्या प्रमाणात शैक्षणिक,सांकृतिक व आर्थिक विकास बौद्ध धर्माचा झालेला दिसून येतो.प्रमुख बौद्ध विद्वान गुप्त काळात झालेले आपल्याला दिसून येते. ज्यात नागार्जुन,वासुबंधू,परमार्थ,दिगनाग प्रमुख आहे. चंद्रगुप्त द्वितीय विक्रमादित्यचा सर्वोच सेनापती आम्रकार्दन देव बौद्ध असून त्याने विदिशा जवळ साची महाविहार करिता एक गाव तथा सोन्याचे पंचवीस दिनार दान दिले होते.ज्यापासून पाच बौद्ध भिक्षु आणि रत्नग्रुहामध्ये दीपक लावण्याचा खर्च केल्या जात होता. **(खोब्रागडे एल. एन.,बौद्ध कालीन भारत का इतिहास, समता प्रकाशन नागपूर)**

राजा हर्षवर्धन प्रत्येक दिवशी एक हजार बौद्ध भिक्षु आणि आणी ५०० ब्राह्मणांना आपल्या मह्लामध्ये जेवण देत होता. याने बौद्ध धर्माशी संबंधित धम्मपरीशदांचे आयोजन केले.व त्यामध्ये मोठ्या प्रमाणात दान केले. ग्रीक शाषक मिलिंद आणि कुशान शाषक कनिश्क यांचे बौद्ध धर्माच्या विकासात महत्वपूर्ण योगदान आहे.मिलिंद प्रश्न नामक ग्रंथात तो बौद्ध धर्माचा रक्षक होता हे लक्षात येते. राजा मिलिंद याने शेवटी बौद्ध भिक्षु बनून आपले संपूर्ण राज्य आपल्या मुलाला हस्तांतरित केले. कनिश्क इस.७८ ते इस. १०२ हा कुशाण वंशातील सर्वश्रेष्ठ राजा होता. याने बौद्ध धर्माचा स्वीकार करून आपला राजधर्म बौद्ध धर्म म्हणून घोषित केला.त्याच्या काळात बौद्ध साहित्य मोठ्या प्रमाणात निर्माण झाले. गांधार आणि मथुरा शैलीतील शिल्पकला याच्याच काळात विकसित झालेली दिसून येते.कानिश्काच्या काळात चौथ्या बौद्धसंगिनी चे आयोजन करण्यात आले होते. याने सर्वप्रथम तथागत बुद्धाची मूर्तीची स्थापना केली. या व्यतिरिक्त अनेक राजे,सेनापती ,सरदार यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार

प्राचीन काळात केलेला दिसून येतो. या सर्वामुळे स्थानिक अर्थव्यवस्था अधिक मजबूत झालेली आपल्याला दिसून येते.

**आर्थिक विकास :**

बौद्ध धर्माने अहिंसा,शांतता,आणि नैतिकतेवर अधिक भर दिला,ज्यामुळे व्यापारी वर्गाने या धर्माचा स्वीकार केलेला दिसून येतो. हा धर्म भारतातून दक्षिण पूर्व आशियात श्रीलंका,चीन,जपान म्यानमार यासारख्या देशात पोहचला. त्यामुळे आंतराष्ट्रीय व्यापार वाढला.

बौद्ध काळात प्रामुख्याने कोणते कोणते व्यापार केले जायचे याचे उदाहरण दीर्घनिकाय मध्ये मिळतात ज्यामध्ये अजातशत्रू आणि तथागत बुद्धाचे संवाद आहे. हस्तीआरोहन, अश्वारोहण, धनुर्धर, पिंडदाइक, उग्रराजपुत्र, महानाग (हत्ती सोबत लढाई करणारा) चर्मयोगी , रंगरेज, कुंभार, गणक, मुद्रिक सारख्या व्यापाराचा उल्लेख होतो. याव्यतिरिक्त धातूचे काम करणारे लोक दगडाचे काम करणारे लोक, जोहरी, मच्छीमार, शिकारी, हलवाई, पुष्प विक्रेता ,चित्रकार सारख्या व्यापाराचा ही उल्लेख मिळतो.

बौद्ध काळात व्यवसाय करणाऱ्या लोकांचे एक संघटन होते त्याला **श्रेणी** म्हणून संबोधले जाते. त्याचा उल्लेख अनेक बौद्ध साहित्यात मिळते. ही श्रेणी स्वतःचे न्याय व स्वतःचे सर्व अधिकार स्वतःवापरत असे. या काळातील बहुतांश व्यवसाय वंशपरंपरेने चालत होते .वडीलाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा तो व्यवसाय करीत असे. छोट्या छोट्या व्यवसायाच्या गल्ल्या अस्तित्वात होत्या असे सुद्धा डॉ. फीक सांगतात. बौद्ध काळात अयोध्या, वाराणसी, बनारस, चंपा, कामपीय, कोसंबी, मथुरा, मिथिला, राजगृह, साकेत, श्रावस्ती, माहिष्मती, वैशाली, पाटलीपुत्र, प्रतिष्ठान यासारखे मोठे शहर अस्तित्वात होते. या व्यतिरिक्त अनेक ग्रामीण भागातही व्यापार चालत असे. बौद्ध काळात दोन प्रकारच्या गावाचा उल्लेख मिळतो एक सामान्य गाव आणि दुसरी व्यावसायिक गाव. बौद्धकाळात व्यापार करण्यासाठी जहाज हे महत्वपूर्ण साधन होते. त्यामुळे जहाजाची मोठ्या प्रमाणात निर्मिती केल्या जात होती. एका जहाजामध्ये 500 ते 1000 व्यापाऱ्यापर्यंत लोक जाईल इतक्या वजनाचे जहाज त्या काळात बनत होते असा उल्लेख विविध जातक कथांमध्ये आहे. या जहाजाच्या माध्यमातून श्रीलंका,सुवर्णभूमी, बेबीलोन सारख्या देशांसोबत भारताचे व्यापारी संबंध स्थापित होते. जहाजाने व्यापार करताना अनेक विपरीत घटना सुद्धा घडलेल्या दिसून येतात. रस्ता मार्गदर्शक म्हणून कावळ्याचा उपयोग करताना आपल्याला दिसून येते.

जल मार्गाबरोबरच स्थल मार्गाने सुद्धा व्यापार मोठ्या प्रमाणात चालत होता. अनेक व्यापारी सोबत मिळून हा व्यापार करतानांचा उल्लेख जातक कथांमध्ये आढळून येतो. त्याचे कारण असे त्यावेळेस भारतात मोठ्या प्रमाणात जंगल होते, रस्ते एवढे सुरक्षित नव्हते त्यामुळे अधिक संख्यांनी लोक एकत्र येऊन स्थल मार्गाने व्यापार करत होते.ज्यामध्ये पाचशे ते हजार पर्यंत काफीले बैल गाड्या राहत होत्या. हा व्यापार होत असताना काही लुटेरे आपल्या प्रयत्नात राहत होते. म्हणून रक्षकाची सुद्धा व्यवस्था या व्यापारी प्रवासात करण्यात येत होती. ज्यामध्ये शस्त्र घेऊन पहारेकरी राहत असे. रक्षक डाकू बरोबरच जंगली जानवर भूत प्रेत यासारख्या आपत्तीपासून या काफिल्यांचे रक्षण करीत होती. गांधार जातक कथेत एका व्यापाराचे वर्णन दिलेली असून त्यामध्ये विदेह पासून गांधार चे अंतर बाराशे मिल जवळपास आहे. स्थल मार्गाने मिळविले जात असे. जातक कथांमध्ये उत्तरेपासून दक्षिण पश्चिम पर्यंत, उत्तरेपासून दक्षिण पूर्व पर्यंत व्यापार चालत होता व तो कोणत्या मार्गाने जात होता या सर्वांची इत्तमभूत

वर्णन केलेले आहे. **(विद्यालंकार सत्यकेतु, प्राचीन भारत का धार्मिक,सामाजिक एवं आर्थिक इतिहास, प्रकाशक श्री सरस्वती सदन ,नवी दिल्ली)**

बौद्ध काळातील मुद्रा पद्धतीचा विचार केल्यास काषार्पण हा प्रमुख शिक्का होता. याव्यतिरिक्त निष्क, सुवर्ण आणि धरण नावाच्या शिक्याचा पण उल्लेख आढळतो.

**शैक्षणिक संस्थाचा विकास आणि अनुदान :**

नालंदा विक्रमशीला तक्षशिला यासारख्या विद्यापीठांचा विकास बौद्ध काळात झाला याचा उल्लेख आपण वरती केलेला आहे. या ठिकाणी देश-विदेशातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात येत असल्यामुळे शैक्षणिक पर्यटन सुद्धा या काळात मोठ्या प्रमाणात होत होते. ज्यातून मोठ्या प्रमाणात स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळाली. या महाविद्यालय आणि विद्यापीठांमध्ये अनेक कारागीर व इतर लोकांना मोठ्या प्रमाणात काम मिळाले.

बौद्ध धर्माचा स्वीकार केलेले अनेक राजा महाराजांनी बुद्धसंघांना जमीन, पैसा, अन्नधान्य, वस्त्र व इतरही वस्तूचे दान दिले. हे दान मिळाल्यामुळे बुद्ध संघ स्थिर झाला. त्यामुळे त्यांच्या सामाजिक कार्याला गती मिळाली.त्याचबरोबर त्यांचा आर्थिक दृष्टिकोनातून मोठ्या प्रमाणात विकास घडून आला आणि या संघटनांनी आलेल्या दानातून समाजासाठी वैद्यकीय सेवा व शिक्षण यासारख्या सेवा देण्याचे अमूल्य कार्य केले.

**निष्कर्ष :**

सुरुवातीच्या काळात बौद्ध धर्माचा विशेष प्रचार झाला नव्हता परंतु बौद्ध धर्माला मिळालेला राजाश्रय यातून बौद्ध धर्माचा सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचा तो आधारस्तंभ ठरला. राजाश्रयामुळे बौद्ध धर्माच्या प्रचार प्रसार तर झाला त्यातूनच व्यापार, बांधकाम, शिल्पकला, शिक्षण आणि रोजगार यासारख्या अनेक क्षेत्रांमध्ये बौद्ध धर्माचा विकास झपाट्याने घडून आला. हा विकास केवळ धर्माशी संबंधित नसून तो समाजाच्या सर्व अंगावर सकारात्मक परिणाम करणारा ठरला ज्यातून मोठ्या प्रमाणात व्यापार घडून आला आणि तो धर्म केवळ देशापुरता सीमित न राहून परदेशात ही तो मोठ्या प्रमाणात प्रचलित व विकसित झाला. आतापर्यंत शूद्र समजल्या जाणाऱ्या लोकांपर्यंत जो विकास अडकून पडला होता तो आता बौद्ध काळात कुठेतरी त्याला गती प्राप्त झालेली दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 1956 मध्ये धम्मदीक्षा घेऊन त्याची गती अधिकच वाढवीली ज्यामुळे नोकरीत संधी, व्यापार, सामाजिक समता भरून निघाल्या.

**संदर्भसूची :**


- विद्यालंकार सत्यकेतु, प्राचीन भारत का धार्मिक,सामाजिक एवं आर्थिक इतिहास,प्रकाशक श्री सरस्वती सदन ,नवी दिल्ली
- खोब्रागडे एल. एन.,बौद्ध कालीन भारत का इतिहास, समता प्रकाशन नागपूर
- Dutt, Sukumar. Buddhist Monks and Monasteries of India: Their History and Contribution to Indian Culture.

- Thapar, Romila. Ashoka and the Decline of the Mauryas.
- Gokhale, Balkrishna Govind. Ancient India: History and Culture.
- Tripathi, Ram Sharan. History of Ancient India.
- विविधतेत एकता,यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक

Research Hub International Journal